महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

**दिनांक ०८/०४/२०२३**

---

**वणी शहरातील आयपीएल जुगार अड्डयावर धाड टाकुन केला १,६७,६५०/- रु चा मुददेमाल जप्त**
**स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळची कारवाई**

जिल्हयात अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होण्याचे दृष्टीने मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी संपुर्ण जिल्हयात प्रभावी कारवाई करुन अवैध धंदयाना आळा घालण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी अधिनस्त पथकांना अवैध धंदयाची गोपनिय माहीती काढुन प्रभावी छापा कारवाई करणे बाबत सुचना दिल्या आहेत.

दिनांक ०७/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक पो.स्टे. वणी हददीत उघडकीस न आलेले गुन्हे तसेच अवैध धंदयाबाबत गोपणीय माहिती संबधाने वणी शहरात हजर असतांना गोपणीय माहिती मिळाली की,इसम नामे अफसर खान अनवर खान पठाण रा. शास्त्री नगर वणी हा त्याचे मालकीचे आर के कोल डेपो वणी येथे असलेल्या ऑफीसचे पहिल्या मजल्यावर सध्या सुरु असलेल्या IPL T- 20 क्रिकेट सामान्याचे दिनांक ०७/०४/२०२३ रोजी असणाऱ्या हैद्राबाद विरुध्द लखनऊ सुपर जायंट या क्रिकेट मॅचवर मोबाईल फोन व लॅपटॉप चे साहयाने लोकांकडुन पैसे घेवुन पैशांची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळ खेळवित आहे. अशी खात्रीलायक गोपणीय खबर प्राप्त झाल्याने खबरेचे गांभीर्य लक्षात घेवुन स्थागुशा कडील पथकाने तात्काळ पंचासह घटनास्थळी रवाना होवुन छापा कारवाई केली असता क्रिकेट सट्टा घेणारे १) अफसर खान अनवर खान पठाण वय ३६ वर्षे रा. शास्त्री नगर वणी, २) रिझवान सैयद रियाज सैयद वय २२ वर्षे, रा. मोमीणपुरा यवतमाळ असे मोक्यावर मिळुन आल्याने घटनास्थळावर मिळुन आलेले मोबाईल, लॅपटॉप असे क्रिकेट सट्टया करीता लागणारे सर्व साहित्य किमंत १,५०,१५०/- रु तसेच आरोपीताचे अंगझडतीमध्ये मिळुन आलेले नगदी १७,५०० रुपये असा एकुण **१,६७,६५०/- रु चा मुददेमाल** जप्त करुन आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन वणी येथे महाराष्ट्र जुगार अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी व मुददेमाल पुढील कार्यवाही कामी पोलीस स्टेशनचे ताब्यात दिला आहे.

सदरची कारवाई ही वरिष्ठांचे मार्गदर्शनात पो.नि. प्रदीप परदेशी, सपोनि अमोल मुडे, पोउपनि योगेश रंधे, पोहवा योगेश डगवार, सुनिल खंडागळे, पोना सुधीर पांडे, पोकॉ रजनिकांत मडावी सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ तसेच पोलीस निरीक्षक सायबर सेल व त्यांची टिम यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**(शुभांगी गुल्हाणे)**
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक, कार्यालय,यवतमाळ